# शिवाजी विद्यापीठात ९९ टक्क्यांवर लसीकरण

## शिक्षक, कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कोविड-१९ विषयक लसीकरणाला शासनाने केलेल्या आवाहनानुसार जवळपास १०० टक्के सहभाग दर्शविला आहे. पहिला अगर दोन्ही डोस घेणाऱ्या शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या अनुक्रमे ९७ व ९९ टक्क्यांहून अधिक आहे. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाची माहिती मागविली. त्यातून ही समाधानकारक बाब समोर आल्याची माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार,



केंद्र व राज्य सरकारने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना लसीकरण करून घेण्यासंदर्भात आवाहन केले होते. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ प्रशासनानेही आपल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लसीकरण करवून घेण्याचे आवाहन केले. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या सहकार्याने विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामध्ये वेळोवेळी लसीकरण शिबिरेही आयोजित केली. सर्वांनीच या आवाहनाला प्रतिसाद देत लसीकरण करवून घेण्यास प्राधान्य दिले. विद्यापीठ प्रशासनाने लसीकरणासंदर्भातील माहिती सर्व अधिविभाग, अध्यासने, केंद्रे आणि प्रशासकीय विभागांकडून संकलित केली. या माहितीच्या विश्लेषणातून ही बाब समोर आली.

विद्यापीठात कार्यरत २६० शिक्षकांपैकी २१६ जणांनी (८३.०७ टक्के) दोन्ही डोस घेतलेले आहेत, तर ३७ जणांनी (१४.२३ टक्के) पहिला डोस घेतला असून, दुसऱ्या डोससाठी मुदतपूर्तीच्या प्रतीक्षेत आहेत. विद्यापीठातील एकूण ५३४ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी ४६८ (८७.६४ टक्के) जणांनी दोन्ही डोस घेतले असून, ६२ जण (११.६१ टक्के) पहिला डोस घेऊन दुसऱ्या डोससाठी मुदतपूर्तीच्या प्रतीक्षेत आहेत. एकही डोस न घेतलेल्या शिक्षकांची संख्या ७ तर, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या अवघी ४ आहे. यातील काही जण कोविड पॉझिटिव्ह होते, तर काहींनी वैद्यकीय कारणास्तव लस घेतलेली नाही. तथापि, वैद्यकीय सल्ल्यानंतर लसीकरणासंदर्भात निर्णय घेऊ, असे त्यांनी प्रशासनाला कळविले आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. शिंदे यांनी दिली.

### गाफील राहू नका, दक्षता घ्या : कुलगुरू

एक टक्क्याहून कमी असलेल्या या उर्वरित लोकांनी वैद्यकीय सल्ल्यानुसार आपले लसीकरण करून घ्यावे. ज्यांचे लसीकरण झाले आहे, त्यांनीही सदर लाटेमध्ये गाफील न राहता मास्क, सुरक्षित अंतर, सॅनिटायझरचा वापर, आदी दक्षता घेऊन स्वतःसह कुटुंबीयांना व त्यायोगे समाजालाही सुरक्षित ठेवावे. अभ्यागतांनीही या दक्षतेच्या कालखंडात शक्यतो विद्यापीठ कार्यालयात प्रत्यक्ष येण्याचे टाळून ई-मेल, दूरध्वनी आदी साधनांच्या साहाय्याने विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठातील ९९ टक्के शिक्षक, कर्मचाऱ्यांचे लसीकरण पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कोविड लसीकरणाला शासनाने केलेल्या आवाहनानुसार सहभाग नोंदविला आहे. पहिला किंवा दोन्ही डोस घेणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या अनुक्रमे ९७ आणि ९९ टक्क्यांहून अधिक आहे. कोविडच्या तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाकडून शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाची माहिती मागविली. त्यातून ही बाब समोर आल्याची माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मंगळवारी दिली.

एक टक्क्याहून कमी असलेल्या या उर्वरित लोकांनी वैद्यकीय सल्ल्यानुसार आपले लसीकरण करून घ्यावे. ज्यांचे लसीकरण झाले आहे, त्यांनीही गाफील न राहता मास्क, सुरक्षित अंतर, सॅनिटायझरचा वापर, आदी दक्षता घेऊन स्वत:सह कुटुंबीयांना व त्यायोगे समाजालाही सुरक्षित ठेवावे. अभ्यागतांनीही या दक्षतेच्या कालखंडात शक्यतो विद्यापीठ कार्यालयात प्रत्यक्ष येण्याचे टाळून ई-मेल, दूरध्वनी, आदी साधनांच्या साहाय्याने विद्यापीठ प्रशासनाशी संपर्क साधावा.

**- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

विद्यापीठात कार्यरत २६० शिक्षकांपैकी २१६ जणांनी दोन्ही डोस घेतलेले आहेत, तर ३७ जणांनी पहिला डोस घेतला आहे. दुसऱ्या डोससाठी मुदतपूर्तीच्या प्रतीक्षेत आहेत. विद्यापीठातील ५३४ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी ४६८ जणांनी दोन्ही डोस घेतले असून, ६२ जण पहिला डोस घेऊन दुसऱ्या डोससाठी मुदतपूर्तीच्या प्रतीक्षेत आहेत. एकही डोस न घेतलेल्या शिक्षकांची संख्या सात, तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या अवघी चार आहे. यातील काहीजण कोविड पॉझिटिव्ह होते असे कुलसचिव शिंदे यांनी सांगितले.

12 JAN 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिवाळी सत्र परीक्षांचे वेळापत्रक दोन दिवसांत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना व ओमायक्रॉन प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रातील ६६४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन घेण्याचे नियोजन सुरू केले आहे. त्यानुसार दोन दिवसांत विद्यापीठाकडून परीक्षेचे वेळापत्रक जाहीर होणार आहे.

परीक्षा विभागाने हिवाळी सत्रातील परीक्षांची तयारी सुरू केली

**शिवाजी विद्यापीठातून...**

आहे. कोरोना निर्बंधामुळे सध्या ५० टक्के उपस्थितीत कर्मचाऱ्यांवर कामकाज सुरू आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून २ लाख २० हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. अभियांत्रिकी, औषधनिर्माशास्त्र, एमबीए, आर्किटेक्चर, शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होतील. सर्टिफिकेट, डिप्लोमा, पीजी डिप्लोमा कोर्सच्या परीक्षा त्या-त्या महाविद्यालय, विद्यापीठ अधिविभाग स्तरावर घेतल्या जाणार आहेत.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात ९९ टक्के लसीकरण

**कोल्हापूर** : शासनाने केलेल्या आवाहनानुसार सबवलेल्या लसीकरण मोहिमेत शिवाजी विद्यापीठात कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभाग दर्शविला आहे. लसीचा पहिला, दोन्ही डोस घेणाऱ्या शिक्षकांची व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संख्या अनुक्रमे ९७ व ९९ टक्क्यांहून अधिक आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाची माहिती मागवली होती. त्यातून ही समाधानकारक माहिती समोर आल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले. केंद्र व राज्य सरकारने केलेल्या आवाहनानुसार विद्यापीठ प्रशासनानेही लसीकरणाचे आवाहन केले होते.

- **प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांची माहिती**